संक्षिप्त फौ.ख.क्र.११०/२०२०
सर-वि- जमीर व इतर
नि.क्र.१८ खाली

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क. १ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : किशोरकुमार जगदीश वैरागडे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : सहा. पोलीस निरीक्षक
नेमणूक : नियत्रंण कक्ष, नागपूर जि. नागपूर

**<u>सरतपासणी–सहा.सरकारी अभियोक्ता श्री. कन्नाके यांचे तर्फे</u>**

१. मी आरोपींना ओळखतो. ते आज कोर्टात हजर आहे. मी दिनांक ०३. १०.२०१९ रोजी मी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उमरेड येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी मी, ठाणेदार महेश बोरटेकर, नरेंद्र पटले, नरेश बाटबरई आणि रंजित सोनवाने या स्टॉफसह भिवापूर पोलीस स्टेशन येथे पेट्रोलींग करीत होतो. आम्हाला गुप्त माहीतीव्दारा माहीती मिळाली की, रामधन चौक भिवापूर येथे आशिष प्रकाश छत्रे हा लोकाकडून पैसे घेउन, पाईंट खरेदी करून ॲन्ड्रायीड टिव्हीवर, टुलेट आणि फन टार्गेट जुगार खेळत होते. त्यानुसार छापा टाकाला. त्याआधी पंचाना त्याबाबत समन्स देण्यात आला होता. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. तो पंचाना मिळाल्याबाबत त्याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.२३</u>** देण्यात येते. त्यानंतर आम्ही रामधन चौक घटनास्थळी पोहचलो असता तिथे आशिष छत्रे नावाचा इसम मिळून आला. त्याला ऑनलाईन जुगारबाबत विचारले असता त्याने नकार दिला. त्यांनतर सदरची माहीती उपविभागीय अधिकारी यांना फोनव्दारे माहीती दिली. त्यांच्या आदेशावरून झडती घेउन जप्ती केली. जप्ती दरम्यान ४ ॲन्ड्रायीड टिव्ही २० इंचीचे कपंनीचे नाव नसलेले जप्त केले. एक छोटा १६ ॲन्ड्रायीड टिव्ही आणि १४ इंचीचे दोन ॲन्ड्रायीड टिव्ही जप्त केले तसेच ६ ॲन्ड्रायीड टिव्हीचे की–बोर्ड, माउस, ७ ऐन्टीना व एक एअरटेल कंपनीचा हॉटस्पाट, ८ टिव्ही चार्जर आणि

आशिष छत्रेच्या ताब्यातून सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त केला तसेच संदेश सोमश्वर याच्या ताब्यातून मायक्रोमक्स कपंनीचा मोबाईल जप्त केला तसेच जमीर शेख याच्या जीओ कंपनीचा मोबाईल व नंदी १२००/- रूपये जप्त केले. चिंटू शेगावरकर याच्या ताब्यातून समसंग कंपनीचा मोबाईल व नगदी ८००/- रूपयाचा माल एकून असा १,०५,८०४/- रूपयाचा माल पंचासमक्ष जप्त केला. त्याचा घटना स्थळ व जप्ती पंचनमा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. आता मला दाखविलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा बरोबर आहे. त्यास **नि. क्र.२५** देण्यात येते. त्यानंतर आरोपींना भिवापूर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देउन तक्रार दाखल केली. आता मला दाखविलेली तक्रार तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२६** देण्यात येते. आता मला एफआयआर ची प्रत दाखविली, ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क. २७** देण्यात येते. आरोपी आज कोर्टात हजर आहे.

**उलटतपास- आरोपीकरीता श्री. नागोसे वकील साहेब**

२. हे म्हणणे खरे आहे की, पेटोलींगला निघतांना स्टेशन डायरीमध्ये नोंद केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत दिवशी पेट्रोलींग करीत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनास्थळ मी कधी पाहीला नाही. आता मला घटनास्थळाची चर्तुसिमा आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर प्रत्यक्ष कधी गेलो नाही व कधी घटनास्थळ पाहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदाराना नोटीस दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारासमक्ष आरोपीच्या ताब्यातून जप्तीपंचनामा कोणत्याही वस्तू जप्त केली नाही. पंच साक्षीदार हे घटनास्थळावरून बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंच साक्षीदार उमरेडचे राहीवासी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी टु लेट आणि फन टार्गेट खेळ खेळत नव्हता. मी घटनेच्या वेळी उमरेडला राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ व जप्ती पंचनामा हा उमरेडला तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला केसेसचा टार्गेट दयावयाचा असल्यामुळे

भिवापूर पो.स्टेसोबत संगणमत करून खोटी फिर्याद तयार केली. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास - काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत
माझे समक्ष,

( एस.जे.लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक :२२/०८/२०२२